## ॥ श्री ॥
## ॥ बाबा ॥
# पंचा

थंडी वाजते माझ्या नंदलाला । पंचा गुंडाळा त्याच्या अंगाला ॥धृ.॥

एकाग्रतेच्या चरख्यावर । पंचा विणला शुभ्रचार ।
पुसा अंग त्याचे हळूवार । नाजूक तनू त्याची मऊशार ॥1॥

जरी करीतो तो मस्ती फार । दुखाऊ नका त्याला कणभर ।
आम्ही बालके तुझी अजाण । घेई रे कान्हा आम्हा सांभाळून ॥2॥

कसे पुसावे आम्हा कळेना । तुझ्याविना आम्हा रहावेना।
ठेवून तुझा वरदकर । पोचव आम्हा तू पैलतीर ॥3॥

★★★★★